

दैनिक श्रमिक लोकराज्य

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

नांदेड । दैनिक । वर्ष 7 । अंक 73 । रविवार, दि. 8 नोव्हेंबर 2026 । RNI MAHMAR/2021/85782 । पाने 4 । किंमत 2 रूपये । ई-पेपर : www.shramiklokrajya.in

थोडक्यात

फुलंब्रीतील चार गावांची नावे पोर्टलवरून गायब; शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत

छत्रपती संभाजीनगर : फुलंब्री तालुक्यातील पाल, एकघर पाडळी, पेंडगाव आणि बिस्मिल्लाखावाडी या चार गावांची नावे एनआयसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांच्या अग्रीम मदतीचा प्रश्न निर्माण झाला आहे. गावांची नावे पोर्टलवर दिसत नसल्यामुळे संबंधित याद्या अपलोड करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना मदत मिळण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. या तांत्रिक अडचणीवर तोडगा काढण्यासाठी तहसीलदारांकडून पाठपुरावा सुरू आहे. गावांची नावे तातडीने पोर्टलवर उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

ऑनलाइन साडी खरेदीच्या आमिषाने ८.६४ लाखांची फसवणूक

बीड : सोशल मीडियावरील साड्यांच्या जाहिरातीवर विश्वास ठेवणे बीड जिल्ह्यातील एका ७१ वर्षीय निवृत्त मुख्याध्यापिकेला महागात पडले. ऑनलाइन व्यवहाराच्या माध्यमातून त्यांची ८ लाख ६४ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात दोन लाख रुपये होल्ड करण्यात आल्याचे वृत्त आहे. सोशल मीडियावरील आकर्षक जाहिराती, स्वस्त दर आणि ऑनलाइन खरेदीच्या आमिषाला बळी पडताना नागरिकांनी सावध राहण्याची गरज आहे. अनोळखी लिंकवर क्लिक करणे किंवा पडताळणीशिवाय आर्थिक व्यवहार करणे टाळावे, असे आवाहन या घटनेतून पुन्हा अधोरेखित होते.

पाणीटंचाई तीव्र; ५६० टँकरद्वारे पाणीपुरवठा

मराठवाडा : मराठवाड्यात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद झाले असून ३५३ गावे आणि २३३ वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. नागरिकांची तहान भागवण्यासाठी सध्या ५६० टँकर कार्यरत असून, अवघ्या १५ दिवसांत १०० नवीन टँकर वाढवावे लागले आहेत. विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून एकूण ९१७ विहिरींचा वापर पाणीपुरवठ्यासाठी केला जात आहे. बीड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत परिस्थिती अधिक गंभीर आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

वरफळमध्ये शॉर्टसर्किटमुळे आठ एकर ऊस जळून खाक

जालना : जालना जिल्ह्यातील वरफळ येथे शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत आठ एकरांतील ऊस जळून खाक झाल्याची घटना समोर आली आहे. या आगीत ऊस पिकासह तीन तुषार सिंचन संचांचेही नुकसान झाल्याचे वृत्त आहे. ऊस हे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे नगदी पीक असल्याने ऐन हंगामात झालेल्या या नुकसानीमुळे संबंधित शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण होऊ शकते. वीजवाहिन्या आणि विद्युत उपकरणांची नियमित तपासणी करण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनाम्यानंतर मदत मिळते का, याकडे लक्ष लागले आहे.

मांजरा धरण ते लातूर जलवाहिनीवरील पाणीचोरीला आळा घालण्याचे प्रयत्न

लातूर : लातूर शहराच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित मांजरा धरण ते लातूर जलवाहिनीवरील पाणीचोरी रोखण्यासाठी कारवाई सुरू असल्याचे वृत्त आहे. शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या या जलवाहिनीतील पाण्याचा अनधिकृत वापर झाल्यास नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. मराठवाड्यातील अनेक भागांत पाणीटंचाई तीव्र होत असताना उपलब्ध पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे महत्त्वाचे ठरते. जलवाहिनीवरील अनधिकृत जोडण्या किंवा पाणीचोरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियमित देखरेख करणे आवश्यक आहे. या कारवाईमुळे पाण्याचे नुकसान कमी होऊन शहराच्या पुरवठ्याला मदत होण्याची अपेक्षा आहे.

शेतकरी मृत्यूप्रकरणी फायनान्स कंपनीविरोधात खुनाचा गुन्हा

नांदेड : नांदेडमधील खालसा फायनान्स कंपनीशी संबंधित शेतकरी मृत्यूप्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे. कर्जवसुलीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याला मारहाण करून त्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याच्या आरोपानंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवला असून तीन जणांना अटक करण्यात आली आहे. कंपनीच्या कार्यालयाला कुलूप ठोकण्यात आले असून फरार संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके कार्यरत असल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे खासगी वित्तसंस्थांच्या कर्जवसुलीच्या पद्धतींबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रकरणाचा पुढील तपास आणि दोषींवरील कायदेशीर कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बोलेरोच्या छतावर गुप्त कप्पा अन्...; 'पुष्पा' स्टाईल दारूची तस्करी पाहून पोलीसही झाले थक्क

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

बिहार : सोशल मीडियावर दररोज अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. यामध्ये काही वेगवेगळ्या घटनांचे किंवा डान्स, विनोदी प्रसंग, स्टंट अशा वेगवेगळ्या प्रकारच्या घटनांचे व्हिडीओ असतात. काही व्हिडीओ हसवणारे असतात, तर काही व्हिडीओ आश्चर्यचकित करणारे असतात. आता अशाच एका 'पुष्पा' स्टाईल दारू तस्करीचा पर्दाफाश करणारा व्हिडीओ व्हायरल होत आहे. बिहारमध्ये दारूबंदी आहे. मात्र, तरीही बेकायदेशीर दारू तस्करीच्या अनेक घटना समोर येतात. पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागातील



अधिकाऱ्यांच्या नजरेतून वाचण्यासाठी दारू तस्कर नवनवीन शक्कल लढवतात. पण आता नवादा जिल्ह्यात नुकत्याच उघडकीस आलेल्या दारू तस्करीच्या एका प्रकाराने पोलिसांनाही थक्क केलं आहे.

नेमकं घटना काय घडली?

दारू तस्करांनी दारू लपवण्यासाठी बोलेरो गाडीच्या छतामध्ये एक गुप्त कप्पा तयार केला होता आणि त्यामधून दारू तस्करी केली जात होती. पण या 'पुष्पा' स्टाईल दारू तस्करीचा आता पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. नवादा येथे उत्पादन शुल्क विभागाने एका बोलेरो एसयूव्हीच्या छतामध्ये तयार केलेल्या कप्प्यात लपवून ठेवलेला दारूचा साठा शोधून काढला.

यावेळी त्यांना शेकडो लिटर विदेशी दारू सापडली. यामध्ये पोलिसांनी गाडीच्या चालकासह दोन जणांना अटक केली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

'...तोपर्यंत ज्ञानेश कुमारांविरोधातील लढा सुरूच राहणार'; अभिजीत दिपके पुन्हा आक्रमक

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात देशभरात आंदोलने सुरू आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. या मागणीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीनेही मोठ्या प्रमाणात आंदोलन आणि मोर्चे काढण्यात आलेले आहेत. तसेच देशभरातील विविध राज्यात देखील कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीनेही आंदोलन आणि मोर्चे काढण्यात येत आहेत.

आता कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके हे पुन्हा एकदा ज्ञानेश कुमारांविरोधात आक्रमक झाले आहेत. 'देशात स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणूक प्रणाली सुनिश्चित होत नाही, तोपर्यंत ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आपली (सीजेपीची) मोहीम सुरू राहणार आहे', असं अभिजीत दिपके यांनी शनिवारी सांगितलं आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

ऐन दिवाळीत तुकाराम मुंढेंच्या 'एफडीए'चा दणका

झेप्टो, बिर्याणी बाय किलोसह १०५ प्रतिष्ठानांचे परवाने निलंबित

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

मुंबई : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यभरात धडक तपासणी मोहीम हाती घेतली असून अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०५ खाद्य व्यवसायांचे परवाने तात्काळ निलंबित केले आहेत. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, यामध्ये 'झेप्टो', 'ब्लिंकिट' यांसारखे लोकप्रिय क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म तसेच 'बिर्याणी बाय किलो'सारख्या नामांकित फूड ब्रॅण्ड्सचाही समावेश आहे. इंडिया टुडेने



यासंबंधीचे सविस्तर वृत्त दिले आहे.

एफडीएने ४ आणि ५ नोव्हेंबर रोजी राज्यभरात ही विशेष तपासणी मोहीम राबवली. या कारवाईत एकट्या मुंबईतील २८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. यामध्ये झेप्टोचे वरळीतील आऊटलेट, ब्लिंक कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेडद्वारे चालवले जाणारे ब्लिंकिट, तसेच बिर्याणी बाय किलो, टॉसिन पिझ्झाचे वरळी आऊटलेट आणि जम्बो बर्गर यांसारख्या प्रमुख आस्थापनांचा समावेश आहे.

माजी नगराध्यक्ष बाबुराव देबडवार यांना जीवन गौरव पुरस्कार

बालाजी पाटील खतगावकर यांनी भेट देऊन केले अभिनंदन



श्रमिक लोकराज्य नेटवर्क

मुखेड : मुखेड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष बाबुराव देबडवार यांना नुकताच जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी मुखेड येथील त्यांच्या आस्थापनेला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी बाबुराव देबडवार यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

या भेटीप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, ज्येष्ठ नेते टी.व्ही. सोनटक्के, विश्वनाथराव कोलमकर , मुखेड शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील कबनूरकर, मुखेड नगराध्यक्ष प्रतिनिधी तथा नगरसेवक डॉ. अतुल देबडवार, नगरसेवक विजय कोतापल्ले आदी उपस्थित होते. जीवन गौरव पुरस्कारामुळे बाबुराव देबडवार यांच्या कार्याचा सन्मान झाल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

आ. रोहित पवार यांच्या प्रयत्नांना यश !

आत्महत्याग्रस्त ठेकेदार गजानन देवकते यांच्या कुटुंबाला ६० लाख रुपये मंजूर..!

उर्वरित थकीत बिलही लवकरच मिळवून देण्याचे आश्वासन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

मुखेड : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहितदादा पवार यांनी शनिवारी मुखेड दौऱ्यादरम्यान आत्महत्याग्रस्त ठेकेदार गजानन देवकत्ते यांच्या वृद्ध आई, पत्नी व लहान मुलांची भेट घेऊन कुटुंबीयांची त्यांना धीर दिला. यावेळी देवकत्ते यांचे थकीत असलेल्या एकूण १ कोटी २० लाख रुपयांच्या बिलापैकी ६० लाख रुपये तातडीने मंजूर करून देण्यासाठी त्यांनी मंत्रालयातील संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांशी थेट दूरध्वनीवरून संपर्क साधला. त्यांच्या प्रयत्नांमुळे ६० लाख रुपये मंजूर झाल्याने देवकत्ते कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आमदार रोहितदादा पवार यांनी मुखेड दौऱ्याच्या प्रारंभी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुखेड येथील कार्यालयाला धावती भेट दिली. यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव नागोराव जाधव उमरदरीकर यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, उर्वरित थकीत बिलही लवकरात लवकर मंजूर करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी देवकत्ते कुटुंबीयांना दिले. तसेच या प्रकरणात दोषी असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार रोहितदादा पवार यांच्या या तत्पर प्रयत्नांमुळे देवकत्ते कुटुंबीयांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, कुटुंबीयांनी त्यांचे आभार मानले.





यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुखेड तालुकाध्यक्ष शिवाजीराव जाधव, शंकरराव इंगळे, जीवनराव वडजे, प्रा. प्रांजलीताई रावणगावकर, गवळे, लक्ष्मण सोमवारे, युवराज चव्हाण, सुभाष रावणगावकर, शेख शादुला, कैलास मादसवाड, बाबा मणियार, चाहत पठाण, बालाजी पाटील बेळीकर, डूमने पाटील, माजी नगरसेवक जगन्नाथ कामजे, नामदेव देवकत्ते, नामदेव कोणापूरे, उमेश जाधव, राम हदवे, राजू पाटील, मारोती शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर आमदार पवार यांनी आत्महत्याग्रस्त ठेकेदार गजानन देवकत्ते यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना धीर दिला. गजानन देवकत्ते यांचे तब्बल १ कोटी २० लाख रुपयांचे बिल थकीत होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आमदार पवार यांनी मंत्रालयातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना फोन करून ६० लाख रुपये तातडीने मंजूर करून दिले.

संपादकीय

ओब्रिगादो रोनाल्डो!



स्वत:ला शिस्तीचे कुंपण घालून कप्पेबंद करणारा, तिशी-पस्तिशीतही फुटबॉलसारख्या खेळात पोर्तुगालला बाजी मारून देणारा हा खेळाडू आता संघात नसेल...

'सीआर सेव्हन (उफ7)' – मिलेनियल्सपासून जेन-झीपर्यंतच्या सर्वांना तो याच नावाने माहीत. त्याने परवा आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली. म्हणाला, 'पोर्तुगालवासीयांनो, सात क्रमांकाची जर्सी राष्ट्रीय संघाला परत देण्याची वेळ आली आहे. अर्थात, ती फक्त माझीच आहे, असे मी कधीच मानले नाही. पण गेली २३ वर्षे ती परिधान करण्याची, तिचे संरक्षण करण्याची आणि जगभरातील स्टेडियममध्ये ती नेण्याची सुप्रतिष्ठा मला लाभली. आज वेळ झाली, ती पुढच्या पिढीकडे सोपवण्याची. नव्हताच हा सोपा निर्णय. कारण, काही निर्णय केवळ मनाने घेऊन चालत नाहीत, ते हृदयी जागवावे लागतात...' – तब्बल २३ वर्षे फुटबॉलसारखा रांगडा, दमसासाची परीक्षा पाहणारा आणि नावात पायाच्या वापराचा संकेत असला, तरी 'डोक्या'ने खेळावा लागणारा खेळ सलग खेळत राहणे यासाठी कठोर तपश्चर्याच लागते. त्याच्या पूर्तीची घोषणा करताना ख्रिस्तियानो रोनाल्डो भावुक झाला. तेही बरेच झाले.

कारण तो म्हणजे काही अव्याहत चालणारे यंत्र नव्हते. त्याने स्वत:ला शिस्तीचे कुंपण घालून कप्पेबंद केले होते, ते तंदुरुस्ती टिकवून बराच काळ स्पर्धात्मक खेळण्यासाठी. शारीरिक तंदुरुस्ती राखताना काही 'मानवी' चोचले टाळावे लागतातच. आनंद कशात मिळवायचा, आवडता खेळ खेळत राहण्यात, की अनिर्बंध मजा करण्यात, यात निवड करावीच लागते. त्याशिवाय देशासाठी सलग सहा विश्वचषक स्पर्धांत प्रतिनिधित्व, २३४ सामने, १४६ गोल अशी विक्रमी कामगिरी करता येत नाही. ज्याच्या अचूकतेच्या ध्यासाने तंत्रज्ञानालाही चकित केले, असा हा ख्रिस्तियानो रोनाल्डो. महिनाभरापूर्वीच अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीने निवृत्ती जाहीर केली. आता रोनाल्डोही थांबतो आहे. फुटबॉलमध्ये एकाच वेळी चमकत असलेले दोन तारे आता मैदानावर दिसणार नाहीत. हे दोघेही यंदाच्या विश्वचषक स्पर्धेनंतरच फुटबॉलला अलविदा करतील, अशी फुटबॉल चाहत्यांची अटकळ होती. पण दोघांनीही निवृत्तीची वेळ स्वत: ठरवली. ते योग्यच, कारण हे दोन्ही तारे इतके स्वयंप्रकाशित होते, की आपल्या आतील प्रकाशाचा दीप कधी मालवायचा, हे त्यांनीच ठरवणे योग्य.

आपल्याकडेही सचिन तेंडुलकरने विश्वचषक जिंकल्यानंतर निवृत्त व्हावे, असे अनेकांनी म्हटले. पण नंतर दोन वर्षे तो तितक्याच तेजाने चमकत राहिला. मेस्सी आणि रोनाल्डो महिनाभराच्या फरकाने फुटबॉलचा निरोप घेत असताना फुटबॉलमधील एक तेजस्वी युग या वर्षी संपते आहे, ही जाणीव उजागर होणे फुटबॉलच्या भविष्यासाठी महत्त्वाचे. कारण, असे खेळाडू स्वप्रतिभेने खेळालाही मोठे करत असतात. मेस्सी आणि रोनाल्डोमधला महत्त्वाचा फरक म्हणजे, ते ज्या देशात जन्मले त्या देशांचे फुटबॉलमधील आंतरराष्ट्रीय पातळीवर असलेले स्थान. अर्जेंटिना मेस्सीपूर्वीही विश्वविजेते होते. वैयक्तिक करिश्म्याबद्दल बोलायचे, तर अर्जेंटिनाने मेस्सीपूर्वी मॅरेडोनाचा बहर पाहिला होता. या दोघाना साथ देणारे सगळेच खेळाडू लॅटिन अमेरिकन शैलीतील फुटबॉल पदन्यासाचे उपजत धनी होते. मुळात फुटबॉल हा ज्या देशांचा श्वास आहे, त्यातील एक असलेल्या अर्जेंटिनात मेस्सी जन्मला होता. आतापर्यंत ज्या २३ विश्वचषक स्पर्धा खेळल्या गेल्या, त्यातील १९ स्पर्धांत अर्जेंटिना होतीच. पोर्तुगालसाठी ही संख्या फक्त नऊ आहे आणि त्यातील सहा सलग स्पर्धांत रोनाल्डो खेळला आहे. रोनाल्डोचे असणे पोर्तुगालसाठी हे असे इतके महत्त्वाचे होते.

पोर्तुगालचा १९६० च्या दशकातील श्रेष्ठ फुटबॉलपटू युसेबियो याच्यानंतर रोनाल्डो निर्माण व्हायला पाच दशके उलटावी लागली. युसेबियो असताना १९६६ च्या विश्वचषक स्पर्धेत पोर्तुगाल तिसऱ्या स्थानापर्यंत पोहोचले होते, तेही प्रवासात गतविजेत्या ब्राझीलला गट साखळीतच गारद करून. युसेबियो त्या स्पर्धेतील गोल्डन बूटविजेता. रोनाल्डो खेळाडू म्हणून आणि पोर्तुगालचा कर्णधार म्हणूनही निश्चित यापेक्षा पुढे गेला. रोनाल्डोच्या नेतृत्वाखाली पोर्तुगालने २०१६ मध्ये युरो कप, २०१९ आणि २०२५ मध्ये युएफा नेशन्स लीग या स्पर्धांची विजेतीपदे मिळवली. त्याच्या नेतृत्वाच्या काळात फुटबॉलचा राष्ट्रीय संघ हा पोर्तुगीज अस्मितेचे प्रतीक बनला. आर्थिक संकटातील पोर्तुगालला फुटबॉल संघाने आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख देणे, हे फुटबॉलपलीकडेही मोलाचे होते. पोर्तुगालवासीयांच्या फुटबॉल संघाप्रति असलेल्या या आदराचा केंद्रबिंदू रोनाल्डो होता. अर्थात त्याची फॅशन, देखणेपण मिरवण्याची हौस, अहं कुरवाळण्याचा सोस प्रत्येकाला रुचेल असा नव्हता. रोनाल्डोचे व्यक्तिमत्त्व आत्मकेंद्री असल्याने पोर्तुगालमधील सगळेच युवक त्याच्यात स्वत:चे प्रतिबिंब पाहत नसतीलही. पण म्हणून त्याने संघाला आणि पर्यायाने देशाला दाखवलेले यश टाळणे शक्य नाही.

नव्या शतकात युरोपातील क्लब फुटबॉलने रोनाल्डोच्या वैयक्तिक करिश्म्याला अधिक झळाळी दिली. रोनाल्डो त्याच्या पूर्ण बहराच्या काळात इंग्लंडमधील मँचेस्टर युनायटेड आणि नंतर स्पेनमधील रेआल माद्रिद या मातब्बर क्लबकडून खेळला. या दोन्ही क्लबमध्ये जगभरातील अत्यंत गुणवान खेळाडू खेळतात. त्यांच्याबरोबर खेळायला लागणारी प्रतिभा रोनाल्डोकडे खचितच होती. त्या जोडीने इतर खेळाडूंबरोबर व्यूहात्मक डावपेचांची सातत्याने होत जाणारी उजळणी हा अतिरिक्त लाभ. ती त्याला राष्ट्रीय संघाचे नेतृत्व करताना उपयोगी पडली. म्हणजे तो स्वत: गोल करण्याची संधी साधण्यात माहीर. पण ती निर्माण करून देणारेही संघात असावे लागतात. क्लबमध्ये खेळताना तसे खेळाडू सहजपणे उपलब्ध होते. पोर्तुगालकडून खेळताना त्याला तेवढा प्रातिभ पाठिंबा प्रत्येक वेळी होताच असे नाही. त्यामुळे कष्ट जास्त घ्यावे लागले. पण मग त्या प्रक्रियेत बर्नार्डो सिल्व्हा किंवा ब्रुनो फर्नांडेससारखे खेळाडूही घडले.

रोनाल्डो हा आक्रमण फळीतील फुटबॉलपटू. स्वभावानेही आक्रमक. जवळपास दोन दशके पोर्तुगालचे नेतृत्व करताना सुरुवातीला प्रशिक्षक लुई स्कोलारींनी त्याला चांगले सांभाळून घेतले. सप्टेंबर २००५ मध्ये विश्वचषक स्पर्धेच्या पात्रतेसाठी रशियाविरुद्धच्या सामन्यापूर्वी रोनाल्डोचे वडील निवर्तले. स्कोलारींनी त्याला घरी परतण्याचा पर्याय दिला होता. पण रोनाल्डो दु:खात असूनही खेळला. स्कोलारी आणि त्या वेळचा पोर्तुगालचा कर्णधार लुइ फिगोला रोनाल्डोने इतकेच सांगितले की, इतर सर्व खेळाडूंना माझ्याशी नेहमीसारखे वागायला सांगा, मला सहानुभूती नको. स्कोलारी आणि फिगोने तसेच केले. परवा निवृत्त होईपर्यंतच्या सर्व काळात रोनाल्डोला राष्ट्रीय संघातील असण्यानेच मानसिकरीत्या उभे राहण्याचे बळ दिले. पण पुढल्या काळात प्रशिक्षकांशी न जमण्याचे प्रसंग येत राहिले. आताही निवृत्ती जाहीर करण्यापूर्वी नवे प्रशिक्षक जॉर्ज जेझुस यांच्याशी रोनाल्डोचे बिनसलेच. युएफा नेशन्स लीगच्या नॉर्वेविरुद्धच्या सामन्यात त्याला राखीव खेळाडूंत बसवण्यात आले. उत्तरार्धात मैदानात उतरण्यासाठी तयारी करूनही त्याला संधीच दिली गेली नाही. २००८ नंतर प्रथमच असे झाले. महाशय प्रचंड नाराज झाले. त्यातच डेन्मार्कविरुद्धच्या सामन्यातही सुरुवातीला त्याला उतरवणार नसल्याचे जेझुस यांनी स्पष्ट केल्यावर तर रागाने तो संघाचे सराव शिबीरच सोडून गेला. जेझुसने शब्द पाळला नाही, असा रोनाल्डोचा आरोप. पण शिस्त मोडल्याबद्दल पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशनने त्याला दंड केला आणि त्याच्यावर ३० दिवसांची बंदीही घातली.

त्याच्या निवृत्तीची बातमी आली ती या पार्श्वभूमीवर. आता पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशन म्हणते आहे की, त्याला साजेसा निरोप त्याला दिला जाईल. जेझुसही म्हणतात की मला तो संघात हवा होता. पण परतीचा दरवाजा वाजवायचा की नाही, हे सर्वस्वी रोनाल्डो ठरवेल. रोनाल्डोने मात्र पोर्तुगालच्या महत्तेचे गोडवे गाऊन, देशाचे आभार मानून विषय संपवला. पोर्तुगीज भाषेत, पोर्तुगालशी बोलताना त्याने वापरलेला आभाराचा शब्दच आज जगाच्या तोंडी असेल... ओब्रिगादो रोनाल्डो!

जिल्हा परिषद शिक्षकांच्या सर्व प्रकारच्या पदोन्नती प्रक्रियांना स्थगितीचे निर्देश!

शिक्षक व विद्यार्थी हिताच्या २८ प्रश्नांवर राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

मुंबई : राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या सर्व प्रकारच्या पदोन्नती प्रक्रिया मुंबई उच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश प्राप्त होईपर्यंत स्थगित ठेवण्याचे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले आहेत. यासोबतच शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार कमी करणे, रिक्त पदे भरणे, जुनी पेन्शन योजना, टीईटी, शाळांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे यांसह शिक्षक व विद्यार्थी हिताच्या २८ महत्त्वपूर्ण प्रश्नांवर मंत्रालयात झालेल्या प्रशासकीय बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामुळे राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांना आता गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग) यांनी शिक्षक व विद्यार्थी हिताच्या विविध मागण्यांचे निवेदन शासनाला सादर केले होते. या निवेदनाच्या अनुषंगाने शालेय शिक्षण राज्यमंत्री नामदार डॉ. पंकज भोयर यांच्या दालनात मंत्रालयात प्रशासकीय बैठक आयोजित करण्यात आली होती.

परिषद पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या प्रशासकीय बैठकीस शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, उपसचिव मोईन ताशीलदार, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग) प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे, प्रांत कार्यवाह पुरुषोत्तम काळे, प्रांत संघटनमंत्री सुरेश दंडवते, प्रांत कार्याध्यक्ष मच्छिंद्र गुरमे, रमेश क्षीरसागर, प्रांत प्रवक्ते दत्तप्रसाद पंडागळे, प्रांत सहकार्यवाह किशोर पिसे, महिला आघाडी प्रमुख वैशाली काकडे, सहप्रमुख सुरेखा ताजवे, कोकण विभागीय अध्यक्ष गणेश पोतदार, देविदास सांगळे, अंकुश माळी, दीपक गिरासे, साईनाथ भालेराव, संजीव अहिरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.या बैठकीची माहिती जिल्हाध्यक्ष व्यंकट गंदपवाड यांनी दिली. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांबाबत शासनस्तरावर झालेल्या या चर्चेमुळे शिक्षक व शिक्षण क्षेत्राचे लक्ष आता पुढील प्रशासकीय निर्णयांकडे लागले आहे.

पदोन्नती प्रक्रिया न्यायालयीन आदेशापर्यंत स्थगित

या बैठकीतील सर्वाधिक महत्त्वाचा निर्णय म्हणजे राज्यातील जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षकांच्या सर्व प्रकारच्या पदोन्नती प्रक्रिया मुंबई उच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश प्राप्त होईपर्यंत स्थगित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच शिक्षकांना अध्यापनासाठी अधिक वेळ मिळावा आणि त्यांच्यावरील ऑनलाइन व प्रशासकीय कामांचा ताण कमी व्हावा, यासाठी अशैक्षणिक कामे कमी करण्याबरोबरच अशा कामांची स्वतंत्र यादी तयार करण्याचे निर्देश राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी दिले. प्रत्येक केंद्रशाळेवर डाटा एन्ट्री ऑपरेटर नियुक्त करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

शिक्षकांच्या सेवाविषयक प्रश्नांवर चर्चा

बैठकीत आधारकार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांना संचमान्यतेत ग्राह्य धरणे, वस्तीशाळा शिक्षकांची सेवा ग्राह्य धरणे, शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी), जुनी पेन्शन योजना, शिक्षकांना बीएलओ कामाची सक्ती न करणे, एसआयआर कामाचे मानधन वाढविणे, अर्जित रजेची नोंद, सेवा व पदोन्नतीविषयक प्रश्न, रिक्त पदे भरणे आणि वेतनश्रेणी यांसारख्या महत्त्वपूर्ण मागण्यांवर चर्चा झाली.

याशिवाय शाळा अनुदान, धोकादायक वर्गखोल्यांची पुनर्बांधणी, शाळांचे वीजबिल माफ करणे, एकाच आवारातील दोन्ही शाळांचे व्यवस्थापन एकत्र करणे, जिल्हा परिषद माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरणे, मुख्याध्यापकांना रजा रोखीकरणाचा लाभ देणे, सन २००२ ते २००५ या कालावधीत नियुक्त शिक्षण सेवकांच्या अंशदान योजनेत झालेली कपात भविष्य निर्वाह निधीत वर्ग करणे, अपंग समावेशित शिक्षण योजनेंतर्गत नियुक्त ५९५ शिक्षकांची पूर्वीची सेवा ग्राह्य धरणे, तसेच राज्य व जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांना पूर्वीप्रमाणे वेतनवाढ देणे आदी मागण्यांवरही चर्चा करण्यात आली.

जिल्हास्तरावर शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही उपक्रम राबविण्यात येऊ नये, गटशिक्षणाधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणे तसेच उपशिक्षणाधिकारी व शिक्षण अधिकारी यांच्या सेवाविषयक बाबींमध्ये आवश्यक बदल करणे, असे विषयही बैठकीत मांडण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या हिताच्या प्रश्नांनाही प्राधान्य

शिक्षकांच्या प्रश्नांसोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या विषयांवरही बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले. शालेय पोषण आहार योजनेतील प्रशासकीय जबाबदाऱ्या कमी करणे, शाळांमधील अतिरिक्त उपक्रमांवर नियंत्रण ठेवणे, विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन पद्धतीत एकसूत्रता आणणे, शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश उपलब्ध करून देणे, तसेच स्थलांतरित कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी आवश्यकतेनुसार हंगामी वसतिगृहे सुरू करणे या मागण्यांवरही सविस्तर चर्चा झाली.

उद्योगमंत्री उदय सामंत आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर

सायाळ येथे शेतकऱ्यांसोबत साजरी करणार दिवाळी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

नांदेड : राज्याचे उद्योग, गुंतवणूक, सेवा व मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ. उदय सामंत हे रविवार, दि. ८ नोव्हेंबर, २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.



रविवार,दि.८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.१५ वाजता ते नांदेड येथून मोटारीने सायाळ (ता. जि. नांदेड) येथे जाण्यासाठी प्रयाण करतील. सकाळी ११.४५ वाजता सायाळ येथे शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करणार आहेत. दुपारी १ वाजता सायाळ येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील. दुपारी १.३० वाजता नांदेड येथे आगमन होईल. त्यानंतरचा वेळ राखीव राहील.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर अखंडित वीजपुरवठ्यासाठी आमदार भीमराव केराम यांची महावितरण अधिकाऱ्यांसोबत बैठक!

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

किनवट : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर किनवट तालुक्यातील नागरिकांना अखंडित वीजपुरवठा मिळावा, यासाठी लोकप्रिय आमदार भीमरावजी केराम यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह, गोकुंदा येथे महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक पार पडली.

यावेळी आमदार साहेबांनी दिवाळीच्या सणादरम्यान संपूर्ण तालुक्यात कुठेही वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच वीजपुरवठ्यात तांत्रिक बिघाड झाल्यास तात्काळ दुरुस्ती करावी आणि आवश्यकतेनुसार रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) तातडीने उपलब्ध करून द्यावे, असे स्पष्ट निर्देश दिले.



याप्रसंगी महावितरणचे कार्यकारी अभियंता रामगीरवार सर (भोकर), उपअभियंता केंद्रे सर (किनवट), नागभिडे सर तसेच मा. नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, गटनेते श्रीनिवास नेमानीवार, यशवंत जाधव सर, अभय नगराळे, बालाजी आलेवार, स्वागत आयनेनीवार, संतोष मरस्कोल्हे (नगरसेवक) गजानन कोल्हे, प्रवीण गावडे, आदी मान्यवर व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

अवैध सावकारी व जबरी कर्जवसुलीविरुद्ध नांदेड जिल्ह्यात विशेष मोहीम

नागरिकांनी निर्भयपणे तक्रारी कराव्यात

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

नांदेड : जिल्ह्यातील अवैध सावकारी, शासनाने निर्धारित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक व्याज आकारणी आणि जबरीने कर्जवसुलीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी सहकार विभागामार्फत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. अशा प्रकारांना बळी पडलेल्या नागरिकांनी कोणत्याही दबावाला न घाबरता निर्भयपणे तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली २४ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय सावकारी समितीच्या बैठकीत प्राप्त तक्रारींचा प्रकरणनिहाय आढावा घेण्यात आला. अवैध सावकारी करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार जिल्ह्यातील परवानाधारक सावकारांची विशेष तपासणी सुरू असून, कर्जवाटप व वसुलीची पद्धत, परवान्यातील अटींचे पालन, व्याजदरांची आकारणी तसेच वसुली अधिकारी व कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासण्यात येत आहे.





सावकारांकडून जबरदस्तीने किंवा दबाव टाकून कर्जवसुली केली जात असल्यास अथवा निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक व्याज आकारले जात असल्यास नागरिकांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड किंवा संबंधित तालुक्याच्या उपनिबंधक अथवा सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात तक्रार नोंदवावी. प्राप्त तक्रारींची पडताळणी करून संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. त्यामुळे अवैध सावकारीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन सहकार विभागाने केले आहे.

शासनाच्या १६ सप्टेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार शेतकऱ्यांना दिलेल्या तारण कर्जासाठी वार्षिक ९ टक्के, तर विनातारण कर्जासाठी १२ टक्के व्याजदर निर्धारित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींना दिलेल्या तारण कर्जासाठी १५ टक्के, तर विनातारण कर्जासाठी १८ टक्के वार्षिक व्याजदराची मर्यादा आहे. या मर्यादेपेक्षा अधिक व्याज आकारणे तसेच चक्रवाढ किंवा दंडव्याज आकारणे अनुज्ञेय नाही.

सद्यस्थितीत जिल्ह्यात १८८ वैध परवानाधारक सावकार असून, त्यापैकी ११४ सावकार नांदेड तालुक्यात आहेत. विशेष तपासणी मोहिमेंतर्गत आतापर्यंत ६२ सावकारांच्या दप्तरांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आवाहनानंतरच्या दहा दिवसांत अवैध सावकारीसंदर्भात २३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी १५ तक्रारींची पडताळणी पूर्ण झाली आहे. उर्वरित तक्रारींवर कार्यवाही सुरू आहे.

सामाजिक बांधिलकीचा आदर्श! वीज कामगार को-ऑप क्रेडिट सोसायटीकडून दुष्काळ निवारणासाठी २.५१ लाखांचा हातभार

नायगांव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण भिलवंडे यांनी देखील वीज कामगार सोसायटीचे चेअरमन तथा नरसीचे भूमिपुत्र रमेश वडगावे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने घेतलेली दुष्काळी मदत निधीची भूमिका लोकाभिमुख कार्याची पावती असल्याची भावना यावेळी अधोरेखित केली.याप्रसंगी माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोकराव चव्हाण, माजी पालकमंत्री डी.पी.सावंत,आ.श्रीजया चव्हाण, सुजया चव्हाण, माजी सभापती श्रावण भिलवंडे, जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



श्रमिक लोकराज्य नेटवर्क

नांदेड : दुष्काळी परिस्थितीत सामाजिक बांधिलकीचे दायित्व जोपासत वीज कामगार को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.नांदेड यांच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीत 2 लाख 51 हजार रुपयाची मदत करण्यात आली.माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते व भाजपा नेते तथा माजी सभापती श्रावण भिलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली चेअरमन रमेश वडगावे यांनी मदतनिधीचा धनादेश जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडे सुपूर्द केला.

सध्या संपूर्ण मराठवाडा दुष्काळाच्या तीव्र झळानी अक्षरशः होरपळून निघाला असून पावसा अभावी खरीप हंगाम पूर्णपणे उध्वस्त झाल्याने शेतकरी वर्ग प्रचंड अर्थिक संकटात सापडल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे.

अशा बिकट परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी सर्वच थरातून मदतीचे आवाहन होत असतांना सामाजिक बांधिलकी जोपासत नांदेड येथील कामगार को-ऑप क्रेडिट सोसायटीचे चेअरमन रमेश वडगावे व संपूर्ण संचालक मंडळाने समय सूचकता दाखवत मदतीचा स्तुत्य निर्णय घेतला.

त्यानुसार शनिवारी सकाळी नांदेड येथे आयोजित एका कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते व भाजपा नेते तथा माजी सभापती श्रावण भिलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या वतीने संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री. रमेश वडगावे , उपाध्यक्ष श्री. कैलास राऊत , सचिव श्री. सतीश वाघमारे, विद्यमान संचालक श्री. ईश्वरसिंग टेलर तसेच कार्यालयीन अधीक्षक (कंत्राटी) श्री. पी. एस. देशमुख यांनी 2 लाख 51 हजार रुपयांच्या मदतीचा धनादेश माजी मुख्यमंत्री तथा भाजपचे राज्यसभेचे खासदार मा. अशोकरावजी चव्हाण साहेब यांच्या हस्ते जिल्हाधिकारी राहुल कर्डीले साहेब यांच्याकडे जमा केला.

दुष्काळात जनहिताला प्राधान्य देतांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीस भरीव मदत करत सत्कार्यांची जाणीव वृद्धीगतं केल्याबद्दल खा.अशोकराव चव्हाण यांनी सोसायटीचे चेअरमन रमेश वडगावे व संचालक मंडळाचे कौतुक केले.

विद्यार्थी घडविणाऱ्या मार्गदर्शकाचा सन्मान

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

मुखेड : चांडोळा येथील सुपुत्र तथा उच्च विद्याविभूषित सतिश निळकंठ पाटील चांडोळकर यांनी गेल्या आठ वर्षांपासून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक म्हणून सातत्याने परिश्रम घेत अनेक विद्यार्थ्यांना योग्य दिशा देत त्यांना घडविण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोमलबाई मुंडे नर्सिंग इन्स्टिट्यूट येथे विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य तथा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन सतिश चांडोळकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच आपल्या मित्राची प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल सतिश चांडोळकर यांनीही संघशिल भद्रे सरांचा सन्मान करून त्यांच्याप्रती आनंद व सद्भावना व्यक्त केली.



यावेळी मनोगत व्यक्त करताना सतिश चांडोळकर म्हणाले की, धनंजय बाबाराव वडजे यांच्याकडून प्रेरणा घेऊन आपण स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली. आज याच क्षेत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना अधिकारी घडविण्याचे कार्य करीत असल्याचा आनंद आणि समाधान आहे. याप्रसंगी त्यांनी इंजि. जयपाल शिरसाठे, ब्रदर्स सुनील जाधव आणि इंजि. दिलीप ताटे यांचाही आवर्जून गौरव केला. गेल्या आठ वर्षांपासून शैक्षणिक व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन क्षेत्रात देत असलेल्या योगदानाबद्दल उपस्थितांनी सतिश चांडोळकर यांचे अभिनंदन करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

जांब जिल्हा परिषद शाळेत निवडणूक!

मतदानातून विश्वनाथ वंजे अध्यक्षपदी, तर शिवनंदा कानगुले उपाध्यक्षपदी निवड

जांब जिल्हा परिषद शाळेच्या इतिहासात पालकांनी मतदानातून सदस्य निवडणे आणि त्यानंतर सदस्यांनी मतदानाद्वारे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणे, ही लोकशाही प्रक्रियेची महत्त्वपूर्ण नोंद ठरली आहे. नवीन समितीच्या माध्यमातून शाळेचा शैक्षणिक विकास होऊन विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील, अशी अपेक्षा पालक व ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

जांब : जांब येथील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या निवड प्रक्रियेत यंदा ऐतिहासिक घडामोड घडली. जुन्या परंपरेला फाटा देत अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड लोकशाही पद्धतीने प्रत्यक्ष मतदानाद्वारे करण्यात आली. या निवड प्रक्रियेमुळे जांबच्या शैक्षणिक क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे.

यावेळी पालकांनी स्वतः मतदान करून शालेय व्यवस्थापन समितीच्या एकूण १५ सदस्यांची निवड केली. त्यानंतर या १५ सदस्यांनी मतदान प्रक्रियेद्वारे अध्यक्षपदी श्री. विश्वनाथ वंजे, तर उपाध्यक्षपदी सौ. शिवनंदा शिवदास कानगुले यांची निवड केली.

या निवड प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री. बनसोडे साहेब



(केंद्रप्रमुख, हिप्परगा (दे.)) उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक संजय थोटे यांनी निवड प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच शाळेतील संपूर्ण शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांसह १५ सदस्यांवर आता शाळेच्या सर्वांगीण विकासाची महत्त्वपूर्ण जबाबदारी असणार आहे. शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शाळेच्या भौतिक विकासासाठी नवीन समितीला काम करावे लागणार आहे.

दरम्यान, जांब येथील जिल्हा परिषद शाळा सध्या सातवीपर्यंत असून, ती आठवीपर्यंत वाढविण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ राऊत यांनी केली आहे. गावातील गरीब, शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी गावाबाहेर जावे लागू नये आणि त्यांना गावातच शिक्षणाची संधी मिळावी, हा या मागणीमागील मुख्य उद्देश आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ राऊत म्हणाले, "अध्यक्षपद हे केवळ मानाचे पद नसून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची मोठी जबाबदारी आहे. राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी एकत्रितपणे शाळेच्या विकासासाठी काम करावे. नवीन समितीने सर्वप्रथम आठवीचा वर्ग सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार करून पाठविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत."

प्रभारी वैद्यकीय अधीक्षकांची वारंवार अनुपस्थिती; माहूर ग्रामीण रुग्णालयाचा कारभार वाऱ्यावर!

वैद्यकीय अधीक्षकासह १४ पदे रिक्त; रुग्णांच्या तक्रारींकडे आरोग्य विभागाचे दुर्लक्ष!

मांडवीतील रिक्त पदांची डॉ. पेरके यांनी घेतली दखल; माहूरच्या आरोग्य व्यवस्थेची दखल कधी?

जिल्हा आरोग्य विभागाने माहूर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकाचे पद तातडीने भरावे, प्रभारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीची खात्री करावी आणि उर्वरित रिक्त पदांवर नियुक्त्या कराव्यात. मांडवीच्या प्रश्नावर जागे झालेले प्रशासन माहूरच्या आरोग्य व्यवस्थेबाबत आणखी किती काळ डोळेझाक करणार? कारण रुग्णालयाला केवळ प्रभारी पदभार नको, तर रुग्णांच्या हाकेला धावून येणारे जबाबदार नेतृत्व हवे आहे.आरोग्यसेवा ही कागदोपत्री उपस्थितीने नव्हे, तर प्रत्यक्ष सेवेतून सिद्ध होते!

मांडवीतील रिक्त पदांवर तातडीने कार्यवाही झाली असताना माहूरमधील वैद्यकीय अधीक्षकाचे रिक्त पद आणि अन्य रिक्त पदांचा प्रश्नही प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे. दुर्गम आदिवासीबहुल भागातील नागरिकांना गंभीर आजार, प्रसूती किंवा आपत्कालीन परिस्थितीत वेळेत उपचार मिळण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ आणि जबाबदार प्रशासकीय नेतृत्व गरजेचे आहे.

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

माहूर : किनवट तालुक्यातील मांडवी येथील गरोदर मातेच्या मृत्यूनंतर बळीराम पाटील रुग्णालयातील ३० पैकी १८ रिक्त पदांची दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके यांनी दोन वैद्यकीय अधिकारी व एका कनिष्ठ लिपिकाच्या नियुक्तीचे आदेश जारी केले. मात्र, माहूर ग्रामीण रुग्णालयातही ३० मंजूर पदांपैकी वैद्यकीय अधीक्षकासह एकूण १४ पदे रिक्त आहेत. अधीक्षकपदाचा प्रभारी कारभार एका वैद्यकीय अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला असला, तरी त्यांच्या वारंवार अनुपस्थितीबाबत रुग्ण व नातेवाइकांच्या तक्रारी आहेत. गंभीर प्रसंगी रुग्णालयाच्या प्रमुखांचीच उपलब्धता नसेल, तर आरोग्य व्यवस्थेचा कारभार चालतो तरी कसा? मांडवीप्रमाणे माहूरच्या प्रश्नांची दखल डॉ. पेरके घेणार कधी, असा सवाल उपस्थित होत आहे.

प्रभारी अधीक्षकांची अनुपस्थिती; रुग्णांची गैरसोय!

माहूर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकाचे पद रिक्त असल्याने एका वैद्यकीय अधिकाऱ्याकडे प्रभारी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मात्र, प्रभारी अधीक्षक ड्युटीवर कमी आणि सुट्टी किंवा बैठकीच्या कारणास्तव रुग्णालयाबाहेर अधिक असतात, अशी तक्रार रुग्ण व नातेवाइकांकडून केली जात आहे. गंभीर घटना अथवा आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधल्यास 'बैठकीत आहे' किंवा 'सुट्टीवर आहे', अशी उत्तरे मिळत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे रुग्णालयाच्या प्रमुखांची प्रत्यक्ष उपलब्धता आणि आपत्कालीन व्यवस्थापनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

३० पैकी १४ पदे रिक्त; आरोग्य यंत्रणेवर ताण!

उपलब्ध अधिकृत पदस्थितीनुसार माहूर ग्रामीण रुग्णालयातील ३० मंजूर पदांपैकी केवळ १६ पदे भरलेली असून वैद्यकीय अधीक्षकासह १४ पदे रिक्त आहेत. तीन वैद्यकीय अधिकारी पदांपैकी एक पद रिक्त आहे. दंत शल्यचिकित्सकाचे एक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्यांची दोन आणि सातपैकी पाच अधिपरिचारिका पदे रिक्त आहेत. याशिवाय सहायक अधीक्षक, शिपाई, वाहनचालक आणि सफाईगारांचीही पदे रिक्त आहेत.

मांडवीत नियुक्तीचे आदेश; माहूरकडे दुर्लक्ष का?

मांडवी येथील बळीराम पाटील रुग्णालयात ३० पैकी १८ पदे रिक्त असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. माजी जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्ल राठोड, भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा संध्याताई राठोड आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश पवार यांनी त्यांची भेट घेऊन आरोग्य सुविधांबाबत चर्चा केली. त्यानंतर डॉ. कृष्णा सूर्यकांत त्र्यंकटवार, डॉ. संभाजी वसंतराव पाटील या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कनिष्ठ लिपिक शिवम कुंटे यांच्या नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले.

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व **संपादक डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **गजानन केशवराव काळे** यांच्या **तेजस्विनी ऑफसेट प्रिंटर्स प्लॉट नं. डी-४१, साई स्मरण ऑइल इंडस्ट्रीज समोर, आर.टी.ओ. रोड, एमआयडीसी नांदेड - 431604** येथे प्रकाशित केले. E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

Daily Shramik Lokrajya, Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO**, Printer **GAJANAN KESHAVRAO KALE.** Printed at **TEJASWINI OFFSET PRINTERSPlot No. D-41, Opp. Sai Smaran Oil Industries R.T.O Road, MIDC Nanded, (Maharashtra) - 431604 M.S.** & Published Near AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715
Email: shramiklokrajya@gmail.com

नांदेड-पुणे-पनवेल रेल्वेचा विस्तार आदिलाबादपर्यंत कधी करणार?

तीनपट भाडेवाढीने प्रवासी त्रस्त; प्रवाशांच्या मागणीकडे शासनाने लक्ष द्यावे

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

किनवट : दिवाळी सणासाठी गावी येणाऱ्या आणि सणानंतर पुन्हा पुण्याकडे परतणाऱ्या प्रवाशांच्या खिशाला खासगी गाड्याच्या वाढीव भाड्याचा प्रवाशांना मोठा फटका बसत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर खासगी गाडीचालकांकडून नेहमीच्या तुलनेत दोन ते तीन पट भाडे आकारले जात असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या खासगी गाडीचे वाढीव भाड्यातून प्रवाशांची करण्यासाठी सुटका नांदेड-पुणे-पनवेल रेल्वेचा विस्तार आदिलाबादपर्यंत करावा, अशी मागणी परवाशाकडून होत आहे. पूर्वी किनवट येथून पुण्यासाठी एक ते दोन खासगी गाड्या धावत होत्या. प्रवाशांची संख्या वाढल्याने आता आणखी दोन गाड्याची भर पडली आहे.

दिवाळीच्या तोंडावर गाडी चालक भाडेवाढ करु लागल्याने सर्वसामान्यांना आर्थिक फटका दररोज बसत आहे किनवट येथील येणाऱ्या जाणाऱ्या



सर्वसामान्य प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्याने विद्यार्थी तेथे शिक्षण घेतात. तसेच रोजगार व नोकरीच्या निमित्ताने अनेक

नांदेड जिल्ह्यापासून किनवट नव्वद किमीवर आहे. तसेच येथे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. मात्र त्या प्रमाणात प्रवासी वाहनांची सख्या नसल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागतो. तसेच खासगी वाहनधारकांकडून प्रवाशांची आर्थिक लूट होत असते. त्यामुळे या मार्गावर रेल्वेसेवा सुरू होणे गरजेचे आहे., सरकारने प्रवाशांचा होणारा त्रास लक्षात घेऊन नांदेड-पुणे-पनवेल असा रेल्वेचा विस्तार करणे आवश्यक आहे.

नागरिक पुणे येथे स्थायिक आहेत. परंतु दिवाळी सणाला गावी येतेवेळेस व परत जातेवेळेस त्यांना अधिकचे भाडे देवून पुणे गाठावे लागत आहे.

रेल्वेसाठी खासदारांनी पाठपुरावा करावा

दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड येथून पुणे-पनवेलसाठी धावणाऱ्या रेल्वेचा विस्तार आदिलाबादपर्यंत केल्यास किनवटसह परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकतो.

स्लीपरचे तिकीट ५५० रुपये, तर वातानुकूलित प्रवासासाठी सुमारे १५०० रुपये खर्च येऊ शकतो. त्यामुळे खासगी बसच्या तुलनेत कमी खर्चात सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होईल.

आदिलाबाद आणि हिंगोलीच्या खासदारांनी या प्रश्नाकडे लक्ष देवून रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी परवाच्याकडून होत आहे.

धर्माबादमध्ये ऐन दुष्काळातही दिवाळीवर विरजण!

आनंदाचा शिधा गायब, निकृष्ट धान्याचा मारा-पुरवठा अधिकारी झोपेत?

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

धर्माबाद : धर्माबाद तालुक्यात दुष्काळाने होरपळलेला शेतकरी आणि गरीब जनता दिवाळीच्या तोंडावर शासनाच्या आनंदाच्या शिध्याकडे डोळे लावून बसली होती.पण पुरवठा विभागाच्या निष्काळजीपणामुळे यंदाची दिवाळी गरीबांच्या नशिबी अंधारच घेऊन आली आहे. आनंदाचा शिधा तर नाहीच, उलट निकृष्ट, खराब धान्य देऊन आणि अनेकांचे रेशनच बंद करून पुरवठा अधिकाऱ्यांनी गरीबांच्या आनंदावर विरजण टाकले आहे.

तालुक्यात पावसाळ्यापासूनच पावसाने पाठ फिरवली.महागडे बियाणे, खते, औषधी, मजुरी यासाठी कर्ज काढून शेतकऱ्यांनी मेहनत केली, पण ऐन फुलोऱ्यात पावसाने दगा दिल्याने खरीप हंगाम पूर्ण वाया गेला. आता रब्बीची तयारी करूनही पावसाअभावी तोही हंगाम धोक्यात आहे. अशा दुष्काळी स्थितीत दिवाळीला आनंदाचा शिधा मिळेल, चार वस्तू स्वस्तात मिळतील, अशी आशा होती. ती आशाही आता मावळली आहे.

मालच पोहोचला नाही, धान्य मात्र सडके!

दिवाळी तोंडावर येऊनही आनंदाच्या शिध्याचा मालच धर्माबादमध्ये पोहोचला नाही. उलट सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यातील धान्यच निकृष्ट दर्जाचे, खराब, किडके वाटप करण्यात आले. हे धान्य जनावरांनाही खाण्यायोग्य नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया लाभार्थ्यांनी दिली आहे.

पुरवठा अधिकारी वाऱ्यावर?

तालुक्यातील हा सगळा सावळा गोंधळ सुरू असताना धर्माबादचे पुरवठा अधिकारी मात्र वाऱ्यावर आहेत. त्यांचे या गंभीर विषयाकडे पूर्ण दुर्लक्ष आहे. लाभार्थी रोज कार्यालयात चकरा मारत आहेत, पण उत्तर मिळत नाही. त्यांच्याशी संपर्क केले असता तहसिलदार यांना बोला असे उद्धाटने बोलत आहेत.

'दीपोत्सव'मधून संकटांवर उपायांचा जागर दिवाळी अंकाचा उचांक कायम-खा. अशोकराव चव्हाण

दुष्काळमुक्त भविष्याचा संकल्प करण्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांचे आवाहन

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

नांदेड : दैनिक सत्यप्रभाच्या 'दीपोत्सव २०२६' दिवाळी अंकाने यंदाही आशयसमृद्धतेचा नवा उचांक गाठला असून, कृत्रिम बुद्धिमत्ता, शिक्षण, पर्यावरण, जागतिक तापमानवाढ आणि दुष्काळ यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर उपायांचा जागर घडविण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केले.

शनिवारी (दि. ७ नोव्हेंबर) शंकरराव चव्हाण मेमोरियल सभागृहात जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते अंकाचे विमोचन झाले. अध्यक्षस्थानी खा. चव्हाण होते. यावेळी माजी पालकमंत्री डी.पी. सावंत, आमदार श्रीजया चव्हाण, सुजया चव्हाण, कार्यकारी संपादक संतोष पांडागळे, संपादक अभिजीत देशमुख, संचालक बालाजी जाधव, संदीप पाटील, सल्लागार सीए मनोहर आयलाने उपस्थित



होते. दुष्काळमुक्त भविष्याचा संकल्प, पाणीबचत व लोकसहभागाचे महत्त्व जिल्हाधिकारी कर्डीले यांनी अधोरेखित केले.

डी.पी. सावंत यांनी समाजहिताची निर्भीड पत्रकारिता काळाची गरज असल्याचे सांगितले. प्रास्ताविक संतोष पांडागळे यांनी केले. सूत्रसंचालन विश्वाधर देशमुख यांनी केले, तर आभार सीए मनोहर आयलाने यांनी मानले. यावेळी वृत्तसंपादक राजेश शिंदे व निर्मिती सहाय्यक संजय सुरकुटवार यांचा खा. चव्हाण यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा व पाणी उपलब्धतेची संयुक्त पाहणी

आंडगा (दक्षिण) येथे पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांची क्षेत्रीय भेट; ग्रामस्थांशी साधला संवाद

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

नांदेड : जिल्ह्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता जाणून घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज लोहा तालुक्यातील आंडगा (दक्षिण) येथे संयुक्त क्षेत्रीय भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

आंडगा (दक्षिण) येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी मन्याड (लिंबोटी) धरणावरील विद्युत मोटारींचा वीजपुरवठा दररोज दोन ते तीन तास सुरू ठेवून जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली होती. या निवेदनाच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी गावाला भेट देऊन ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी जनावरांसाठी चारा





या संयुक्त पाहणीत जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, लोहा येथील तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अंकुश पाटील आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. उत्तम बोदेमवाड उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी चारा व पिण्याच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासह ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने ही पाहणी करण्यात आली.

व पाण्याच्या उपलब्धतेबाबत तसेच विद्युत मोटारींच्या वीजपुरवठ्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने स्थानिक परिस्थितीची माहिती घेतली. परिसरात उपलब्ध असलेल्या वाळलेल्या चाऱ्याचा काटकसरीने व योग्य पद्धतीने वापर करण्याबाबत, निकृष्ट चाऱ्याचे पोषणमूल्य वाढविण्याच्या उपाययोजनांबाबत तसेच पशुधनासाठी संतुलित आहार व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

केवळ हिरवा झेंडा दाखवून आमदार थांबले नाहीत; नव्या जिजाऊ बस मधून केला कंधार-लोहा प्रवास!

पाच 'राजमाता जिजाऊ' बस सेवेत दाखल; प्रवाशांशी संवाद साधत लोहा बसस्थानकाचीही केली पाहणी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

लोहा : दिवाळीच्या मुहूर्तावर एसटी प्रवाशांना नव्या बसची भेट देतानाच आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केवळ उद्घाटनापुरती औपचारिकता न ठेवता थेट नव्या लालपरीतून प्रवास करत प्रवाशांच्या अडचणी जाणून घेतल्या. कंधार आगाराला मिळालेल्या पाच नव्या 'राजमाता जिजाऊ' बसचे पूजन करून हिरवा झेंडा दाखवल्यानंतर त्यांनी कंधार ते लोहा असा बसप्रवास केला. त्यांच्या या अनोख्या उपक्रमामुळे एसटी प्रवाशांमध्ये उत्सुकता निर्माण झाली.

शनिवार, ७ नोव्हेंबर रोजी कंधार आगारात आमदार चिखलीकर यांच्या हस्ते पाच नव्या बसचे पूजन व लोकार्पण करण्यात आले. यावेळी आगारप्रमुख अमर पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. हिरवा झेंडा दाखवल्यानंतर आमदारांनी स्वतः याच नव्या बसमधून लोह्यापर्यंत प्रवास केला. प्रवासादरम्यान त्यांनी सहप्रवाशांशी संवाद साधत एसटी सेवेबाबत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या.

लोहा बसस्थानकात बस दाखल झाल्यानंतर त्यांनी बसस्थानकाची पाहणी केली. 'लालपरीचा प्रवास सुरक्षित आणि सुखकर असून ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेसाठी एसटी ही केवळ वाहतुकीचे साधन नसून जीवनवाहिनी आहे. बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे एसटी महामंडळाचे ब्रीदवाक्य खऱ्या अर्थाने जनसेवेचे प्रतीक आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच बसस्थानकातील सुविधांबाबत संबंधितांना आवश्यक सूचना दिल्या.





यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, आगारप्रमुख अमर पाटील, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, दत्ता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, वाहतूक नियंत्रक मनोहर लांडगे, दत्ता शेटे, केतन खिल्लारे यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

नमो उद्यानाच्या कामाचीही आमदारांकडून पाहणी

एसटी प्रवासानंतर आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शहरातील स्वामी समर्थ मंदिरालगत उभारण्यात येत असलेल्या नमो उद्यानाची पाहणी केली. या उद्यानाचे काम जवळपास पूर्णत्वास आले असून, प्रशस्त जागेत आकर्षक स्वरूपात विकसित होत असलेल्या उद्यानामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.